# कारणे

गुण क्र. १ :- उभय पक्षांच्या तक्रार व खुलासा दाखल कलेले पत्र व सर्कुलर, विद्यूत कायदा २००३ मधील भाग १२ व १४, कलम १२६ मुल्याकंन, कलम १२७ (१ ते ६) Appeal to Appellate Authority, महाराष्ट्र विद्यूत नियामक आयोग (विद्यूत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विधीनियम २००५ मधील कलम १५.४.१ व Circular No. २२४ Maharashtra Electricity Regulatory Commission ( Standards of Performance of Distribution Licensees, Period for giving Supply and Determination of Compensation) Regulations, २०१४ Implementation thereof. मधील १० मधील च्या तरतुदी लक्षात घेऊन मान्य बाबींचा उल्लेख खालील प्रमाणे आहे.

१) गैरअर्जदार यांनी अर्जदाराच्या सप्टेंबर २०१७ च्या बिला पोटी जम्प झालेले ६८५ युनिटचे बिल मागील सहा महिन्यामध्ये विभागणी करुन दिले आहे. कारण ऑक्टोबर २०१७ ते डिसेंबर २०१७ या काळात दर महा २७,३१, व २०, युनीटचे बिले गेली. ग्राहकाचा सरासरी वापर १२० ते १३० युनीट इतका दिसुन येतो. मात्र ग्राहकास एप्रिल २०१७ ते ऑगष्ट २०१७ पर्यतचे बिल निर्गमीत झालेले आहे. तसेच सहा.अभियंता शाखा क्र.८ लातूर यांच्या दि. ०९.१०.२०१७ च्या स्थळ तपासणी अहवालातील जोडभार ६२२.५ Watt असुन त्यामध्ये एक पाण्याच्या बोअर वरील (०.५HP) मोटर आहे.

२) ग्राहकाचा मीटर हा Rolex कंपनीचा असुन तो मुख्य अभियंता MMC प्रकाशगड बांद्रा यांचे पत्र क्र. ७७८ दि.०९.०३.२०१६. नुसार ताबडतोब बदलने आवश्यक आहे.

३) अर्जदार ग्राहकाचे एप्रिल २०१७ ते सप्टेंबर २०१७ या ६ महिन्याचे बिल १९१५-११६१ = ७५४ हे दरमहा ७५४/६=१२६ युनीट प्रमाणे दुरुस्त करण्यात आले आहे. तसेच ६८५ युनीटचे बिल हे समान विभाणी करुन प्रचलीत संगणक प्रणाली नुसार दुरुस्त केले असुन रु.३५०१.३९/- इतके बिल कमी करुन दिले आहे.